# रायगड जिल्हा परिषद,अलिबाग

**(सामान्य प्रशासन विभाग)**

**कुंटेबाग, रायगड जिल्हा परिषद प्रशासकिय इमारत, पहिला मजला, अलिबाग,जि.रायगड पिनकोड-४०२२०१**

email-dyceogen@gmail.com दुरध्वनी क्र.०२१४१-२२२०८२


## जाहीर प्रकटन

जिल्हा परिषद सरळसेवा पदभरती २०२३ अन्वये जिल्हा परिषद रायगड अंतर्गत २१ सवंर्गाची जाहिरात देण्यात आली असुन १७ संवर्गाची परिक्षा IBPS कंपनीमार्फत घेण्यात आली होती. त्यापैकी १२ संवर्गातील पदाचा निकाला IBPS कंपनीमार्फत प्राप्त झालेल्या गुणांच्या आधारे तात्पुरती निवड व प्रतिक्षा यादी प्रसिध्द करण्यात आली.

प्रसिध्द करण्यात आलेल्या तात्पुरत्या निवड व प्रतिक्षा यादीपैकी (१) कनिष्ठ लेखाधिकारी - ०४ पदे (२) कनिष्ठ सहाय्यक (लेखा) - ०४ पदे (३) प्रयोगशाळा तंत्रज्ञ - ०३ पदे (४) लघुलेखक (निम्न श्रेणी) - ०१ पद (५) वरिष्ठ सहाय्यक (लेखा) - ०५ पदे (६) विस्तार अधिकारी (कृषि) - ०४ पदे (७) विस्तार अधिकारी (सांख्यिकी) - ०६ पदे अशा एकुण ०७ संवर्गातील रिक्त पदे भरणे करीता तात्पुरती निवड व प्रतिक्षा यादीतील उमेदवारांचे मुळ शैक्षणिक कागदपत्रे व इतर आवश्यक सर्व दस्तऐवजाची तपासणी जिल्हा परिषद रायगड, कुंटेबाग अलिबाग येथे करण्यात आली.

तात्पुरती निवड यादी व प्रतिक्षा यादीतील उमेदवारांचे कागदपत्रे तपासुन वर नमुद केलेल्या ०७ संवर्गातील उमेदवारांची अंतिम यादी प्रसिध्द करण्यापुर्वी जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी रायगड-अलिबाग यांची मान्यता घेण्यात आली असुन सदरची अंतिम यादी व प्रतिक्षा यादी जिल्हा परिषदेच्या **https://zpraigad.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत आलेली आहे.

दिनांक - १२/०३/२०२४
स्थळ - अलिबाग-रायगड

सही/-x-x-x
(राजेंद्र भालेराव)
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र)
रायगड जिल्हा परिषद,अलिबाग

सही/-x-x-x
(सत्यजित बडे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
रायगड जिल्हा परिषद,अलिबाग